या समवेत:- शुक्रवार दिनांक- ०४ / ०७/२०२५ रोजी सकाळी११.०० वा. प्राप्त झालेल्या अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या,स्थायी समिती सभेचे कामकाज कार्यवृत्त जोडले आहे.

---

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि-१/परिषद/स्थायी सभा/४०४/२०२५
अहिल्यानगर, दिनांक-१८/०७/२०२५

प्रत माहितीसाठी सादर,

१. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
२. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अहिल्यानगर
३. मा.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, अहिल्यानगर
४. खाते प्रमुख सर्व

२/-आपल्या खात्यासंबंधी विषय व त्याबाबतचे ठरावासंबंधी, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेत उपस्थित केलेल्या प्रत्येक मुददयावर उचित कार्यवाही करुन त्याचा अनुपालनचा लेखी अहवाल सामान्य प्रशासन विभागास त्वरीत पाठवावा,म्हणजे पुढील स्थायी समिती सभेस अनुपालन सादर करता येईल.

(राहुल शेळके)
सचिव,स्थायी समिती सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ०४/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. सभेचे कार्यवृत्त

हजर अधिकारी

| अ.क्र. | नाव | अ.क्र | नाव |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री आनंद भंडारी<br>प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | २ | मा.(श्री.संभाजी लांगोरे रजेवर) दादाभाऊ गुंजाळ<br>प्रभारी अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | श्री.राहुल शेळके सचिव स्थायी समिती<br>तथा,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | ४ | श्री.शैलेश मोरे<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ५ | श्री दादाभाऊ गुंजाळ<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) | ६ | श्री.राजेंद्र देसले<br>प्रकल्प संचालक जलजीवन मिशन |
| ७ | श्री महादेव जायभाये<br>जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) | ८ | श्री सागर चौधरी<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.दक्षिण) |
| ९ | श्री.बाळासाहेब ननवरे<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.उत्तर) | १० | श्री.(दिलीप सोनकुसळे)प्रतिनिधी सुभाष सातपुते<br>प्र.उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) |
| ११ | श्री.डपकर शिवम<br>प्रभारी जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा) | १२ | श्री एच बी चव्हाण<br>कार्यकारी अभियंता,(ग्रा.पा.पु.) |
| १३ | श्री सुधीर शिंदे<br>कृषि विकास अधिकारी | १४ | डॉ.श्री दशरथ दिघे<br>जिल्हा पशुसवर्धन अधिकारी |
| १५ | डॉ.श्री बापूसाहेब नागरगोजे<br>जिल्हा आरोग्य अधिकारी | १६ | श्री.भास्कर पाटील<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) |
| १७ | श्रीम संध्या गायकवाड<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | १८ | श्री देविदास कोकाटे<br>जिल्हा समाज कल्याण अधिकारी |
| १९ | श्री बाबासाहेब घोरपडे<br>उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी | २० | श्री. निखिल पठारे<br>प्र.उप अभियंता (भु.स.वि.यो.) |
| २१ | श्री.बाळासाहेब बुगे<br>शिक्षणाधिकारी (योजना) | | |

**विषय क्रमांक १:-** दि. ०५/०६/२०२५ रोजीची स्थायी सभा पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत वाचुन कायम करणे .

**ठराव क्र १४८-** दि . ०५/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा.पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत कायम करणे व संबंधित खात्याने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेत येऊन त्यावर महत्वाचे कार्यवाहीच्या मुद्यावर संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यांची नोंद घेणेत आली.संबंधित सर्व खातेप्रमुखांनी सभेतील कामकाजानुसार तातडीने उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

**विषय क्रमांक २–** ग्रामपंचायत चापडगाव ता. शेवगाव येथे शॉपिंग सेंटर गाळे बांधण्यासाठी जिल्हा ग्रामविकास निधीतून कर्ज मिळणेबाबत.

गट विकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव यांचेकडील पत्र क्र.ग्रापं/२५२/२०२५ दिनांक २२/०४/२०२५ अन्वये प्रस्ताव सादर केलेले आहे. सदर प्रस्तावात ग्रामपंचायत चापडगाव ता. शेवगाव येथे बाजारतळ विकास कामे करण्यासाठी जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज रु. ५०,००,०००/- ची मागणी केलेली आहे.

ग्रामपंचायत चापडगाव ता. शेवगाव यांची मासिक सभा दिनांक २७/०२/२०२५ ठराव क्र. ८ अन्वये तसेच पंचायत समिती शेवगाव सर्वसाधारण सभा दिनांक २६/०३/२०२५ ठराव क्रं.५ अन्वये तसेच ग्रामसभा ठराव क्र. ४ दि. २०/०२/२०२५ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६२,७८,६६०/- इतके आहे.

ग्रामपंचायत चापडगाव ता. शेवगाव यांची मागील तीन वर्षाच्या आर्थिक स्थितीची तपासणी केली असता व गट विकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव यांचे शिफारशीची तपासणी केली असता उत्पन्न व खर्चाचा तपशील अनुसरुन शासन निर्णय व्हीपीए/११५९/पीपीएच/६०दि.२३/०१/१९६० अन्वये अंदाजपत्रकाचे ७५ टक्के रक्कम देता येईल व तसेच शासन निर्णय जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६०(१ ली सुधारणा) २००० दिनांक २५/८/२००० नियम ११(३)(ब) अन्वये उत्पन्नाच्या तीन वर्षाच्या सरासरीचे ३० पट (उत्पादक बाबींसाठी) ग्रामपंचायतीचे परत फेडीचे ऐपत लक्षात घेता रक्कम रु. ३८,५२,४७०/- इतके रक्कम कर्ज खालील अटी व शर्तीवर देता येईल.

१. ज्या कामासाठी कर्ज दिलेले आहे त्या कामासाठी वापर करणेत यावे.
२. कर्जाची परत फेड १० वर्षांत परतफेड करण्यात यावे.
३. सदर कर्जावर व्याज प्रति वर्ष ५ टक्के व दिलेल्या मुदतीत न भरल्यास दंडात्मक व्याज २.५ टक्के अकारण्यात येईल.
४. बांधकाम स्वत:च्या मालकी हक्काचे जागेवरचं करण्यात यावे.
ग्रामपंचायतीकडील विहीत जागेवर बांधकाम करावयाचे असल्यास सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण यांचे मान्यता घेवून बांधकाम सुरु करावे.

५. बांधकाम सुरु करण्यापुर्वी सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण (उदा.रस्ते, वीज) यांचा नाहरकत दाखला घ्यावा.

नियमातील तरतुदी –

१. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी नियम विपीए/११५९/पीपीएच/६० दिनांक २३/१/१९६० अनुसार ७५ टक्के रक्कम देता येईल.

२. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी (१ली सुधारणा) २००० दि.२५/८/२००० नियम ११(३)(ब) अन्वये.

३. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी (१ली सुधारणा) २००० दि.२५/८/२००० नियम ११(२) (क) व (ड)

**ठराव क्रमांक १४९**-- ग्रामपंचायत चापडगाव ता. शेवगाव येथे शॉपिंग सेंटर गाळे बांधण्यासाठी जिल्हा ग्रामविकास निधीतून कर्ज रु. ५०,००,०००/- ची मागणी केलेली आहे. शासन निर्णय व्हीपीए/११५९/पीपीएच/६०दि. २३/०१/१९६० अन्वये अंदाजपत्रकाचे ७५ टक्के रक्कम देता येईल व तसेच शासन निर्णय जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६०(१ ली सुधारणा) २००० दिनांक २५/८/२००० नियम ११(३)(ब) अन्वये उत्पन्नाच्या तीन वर्षांच्या सरासरीचे ३० पट (उत्पादक बाबींसाठी) ग्रामपंचायतीचे परत फेडीचे ऐपत लक्षात घेता रक्कम रु. ३८,५२,४७०/- इतके रक्कम कर्ज खालील अटी व शर्तीवर देता येईल.

1. ज्या कामासाठी कर्ज दिलेले आहे त्या कामासाठी वापर करणेत यावे.
2. कर्जाची परत फेड १० वर्षांत परतफेड करण्यात यावे.
3. सदर कर्जावर व्याज प्रति वर्ष ५ टक्के व दिलेल्या मुदतीत न भरल्यास दंडात्मक व्याज २.५ टक्के आकारण्यात येईल.
4. बांधकाम स्वत:च्या मालकी हक्काचे जागेवरचं करण्यात यावे.
   ग्रामपंचायतीकडील विहीत जागेवर बांधकाम करावयाचे असल्यास सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण यांचे मान्यता घेवून बांधकाम सुरु करावे.
5. बांधकाम सुरु करण्यापुर्वी सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण (उदा.रस्ते, वीज) यांचा नाहरकत दाखला घ्यावा.

## विषय क्र. ३-डॉ.गहिनीनाथ ज्ञानोबा येनगे, पशुधन विकास अधिकारी, पशुवैदयकीय दवाखाना श्रे-१, केलवड ता.राहाता याची वैदयकीय कारणास्तव परावर्तीत रजा मंजुरीस मान्यता देणेबाबत.

१. प्रस्तावना :-डॉ.गहिनीनाथ ज्ञानोबा येनगे, पशुधन विकास अधिकारी, पशुवैदयकीय दवाखाना श्रे-१, केलवड ता.राहाता यांची दिनांक २३/११/२०२३ ते २७/०६/२०२४ अखेर एकुण २१८ दिवसांची वैदयकीय कारणास्तव वैदयकीय रजा मंजुरीबाबत

२. नियमातील तरतुदी :- महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १०९(३) (घ) अन्वये वर्ग-१ व वर्ग-२ अधिका-यांच्या दोन महिन्यापेक्षा जास्त परंतु चार महिन्यापर्यंतच्या रजा मंजूर करण्याचे अधिकार मा.सभापती,स्थायी समिती यांना देण्यात आले आहेत.सदयस्थितीत समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील राजपत्र असाधारण.२६ दि.११ मार्च २०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे व सर्व अधिकार त्यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

३.विभागाचे अभिप्राय :- डॉ.गहिनीनाथ ज्ञानोबा येनगे, पशुधन विकास अधिकारी, पशुवैदयकीय दवाखाना श्रे-१, केलवड ता.राहाता यांची दिनांक २३/११/२०२३ ते २७/०६/२०२४ अखेर एकुण २१८ दिवसांची वैदयकीय कारणास्तव वैदयकीय रजा खालील प्रमाणे मंजुर करणेबाबत शिल्लक वैदयकीय रजा - २५, खर्ची टाकावयाची रजा २४ ÷ २ = १२ दिवस शिल्लक अर्जित रजा - ३७ खर्ची टाकावयाची रजा ३७ दिवस (वैदयकीय कारणास्तव अर्जित रजा व वैदयकीय रजा ४९ दिवस)वैदयकीय कारणास्तव असाधारण रजा (विना वेतन) १६९ दिवस एकुण मंजुर करावयाची रजा २१८ दिवस महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १०९(३) (घ) अन्वये वर्ग-१ व वर्ग-२ अधिका-यांच्या १२० दिवसापुढील परंतु २४० दिवसापर्यंत रजा मंजूर करण्याचे अधिकार

मा.सभापती, स्थायी समिती यांना देण्यात आले आहेत. तथापी समिती अस्तित्वात नसल्याने सदर अधिकार प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेले आहे. सबब त्यांची अर्जितरजा, वैदयकीय रजा व असाधारण रजा मंजूर होणेस हरकत नाही.

**ठराव क्रमांक १५०-** डॉ.गहिनीनाथ ज्ञानोबा येनगे, पशुधन विकास अधिकारी, पशुवैदयकीय दवाखाना श्रे-१, केलवड ता.राहाता यांची दिनांक २३/११/२०२३ ते २७/०६/२०२४ अखेर एकुण २१८ दिवसांची वैदयकीय कारणास्तव वैदयकीय रजा मंजुर करावयाची आहे. डॉ.गहिनीनाथ ज्ञानोबा येनगे, पशुधन विकास अधिकारी, पशुवैदयकीय दवाखाना श्रे-१, केलवड ता.राहाता यांचे मुळ सेवापुस्तकांत वैदयकीय रजा खाती एकुण २५ दिवस व अर्जित रजा ३७ दिवस शिल्लक आहेत. त्यांची मागणी विचारात घेता वैदयकीय रजा २४ ÷ २ = १२ दिवस (दुप्पट खर्ची घालुन) व अर्जित रजा ३७ दिवस मिळुन एकुण ३७ दिवस वजा जाता उर्वरीत रजा एकुण १६९ दिवस असाधारण रजा अशी एकुण २१८ दिवस महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम १०९ (३)(ड) अन्वये या व्दारे मान्यता देण्यात येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा समाप्त होण्यापुर्वी मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व विभागांनी या पुढे दक्षता घ्यावी की जेथे मुळ मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार आहेत तेथे फक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असा उल्लेख करावा. तथा प्रशासक करु नये याची दक्षता घ्यावी. व यापुढे कोणत्याही विभागांनी ऐनवेळचे विषय सादर करु नये या बाबत दक्षता घ्यावी.

सचिव तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रशासक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर